महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ

४ था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१
Website - https://msbsvet.edu.in Email - msbve.secretary@dvet.gov.in दुरध्वनी क्र. ०८६५५९४४८५१/५२/५३/५४

परावैद्यक अभ्यासक्रम पत्र क्र.का.क्र.७/शैक्षणिक/२०२६/१७१०
परिपत्रक दि.११.०८.२०२६

विषय: मंडळाच्या परावैद्यक गटातील (Paramedical) अभ्यासक्रमांच्या प्रवेश पात्रता व परीक्षा पध्दतीत सुधारणा करण्याबाबत...

संदर्भ:

१. शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्र. इएक्सएम-७३८४/३८७५१/(५३५) तांशि-१ (अ), दि.२३.०१.१९८६
२. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२१/प्र.क्र.१०/कौशल्य-२, दि.११.०२.२०२१
३. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ अधिनियम, २०२१ (सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९), दि.२०.०१.२०२२
४. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग शासन अधिसूचना क्र.व्हिओसी-२०२०/प्र.क्र.१११/कौशल्य-२, दि.२५.०१.२०२२
५. शासन निर्णय क्र. व्हीओसी-२०२०/प्र.क्र.१११/कौशल्य-२, दि.१६.२.२०२२
६. वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग अधिसूचना दि.१३.११.२०१९
७. महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई यांचे जा. पत्र क्र. मपवैप/परिषद/३२८/२०२५, दि.११.११.२०२५
८. वैद्यिकय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचेकडील पत्र क्र. परावै-०७१९/प्र.क्र.१६४/अधिनियम, दि.०४.०८.२०२६ नुसार आयोजित बैठक

१. सन १९५६ मध्ये तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे (Maharashtra State Board of Technical Education - MSBTE) संदर्भीय शासन निर्णय क्र.०१ अन्वये विभाजन करुन महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाची (Maharashtra State Board of Vocational Education - MSBVE) स्थापना करण्यात आली. तदनंतर संदर्भीय शासन निर्णय क्र.०२ अन्वये सदर मंडळाचे नामांतरण महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ असे करण्यात आले होते.

२. राष्ट्रीय कौशल्य अर्हता आराखडा यानुसार कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आणि उद्योजकता शिक्षण व महाराष्ट्र राज्यातील इतर कौशल्य पाठ्यक्रम यांच्याशी संबंधित असणाऱ्या बाबींचे नियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक इतर बाबींसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळाचे नामांतरण करुन "महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ" स्थापन करण्यासाठी व विधीसंस्थापित करण्यासाठी "महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ अधिनियम,

२०२१ (सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९)" दि.२०.०१.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आला. सदर अधिनियमाची अंमलबजावणी दि.२६.०१.२०२२ पासून करण्याबाबतची अधिसूचना संदर्भीय क्र.०४ अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे.

३. मंडळामार्फत मंडळाने तयार केलेले अल्पकालावधीचे अर्ध वेळ (Part Time) प्रमाणपत्र (Certificate) अभ्यासक्रम, १ वर्ष कालावधीचे पूर्ण वेळ प्रमाणपत्र (Certificate) अभ्यासक्रम, १ व २ वर्ष कालावधीचे पदविका व प्रगत पदविका अभ्यासक्रमांत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

४. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ व महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद यांचे कार्ये व उद्दिष्ट्ये समान असल्याने संदर्भीय शासन निर्णय क्र.०५ अन्वये महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामध्ये महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद या संस्थेचे विलीनीकरण करण्यात आले आहे. सबब, परिषदेची निर्धारित कार्ये आता मंडळाव्दारे अंमलात आणण्यात येत आहेत. सबब राष्ट्रीय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिषद (NCVET) व्दारे मान्यता प्राप्त सर्व अभ्यासक्रम मंडळाद्वारे स्विकारण्यात आले आहेत.

५. मंडळाच्या स्थापनेपासून मंडळांतर्गत परावैद्यक गटातील संदर्भीय अधिसूचना क्र.०६ च्या भाग इ (Part E) मध्ये नमुद पदविका (Diploma) अभ्यासक्रम व भाग फ (Part F) मध्ये नमुद प्रमाणपत्र (Certificate) अभ्यासक्रमांत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच, राष्ट्रीय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिषद (NCVET) यांनी निर्गमित केलेले NSQF दर्जाच्या प्रमाणपत्र (Certificate) अभ्यासक्रमांत देखिल प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

६. संदर्भीय क्र.०७ अन्वये महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार केंद्र शासनाच्या National Commission for Allied and Healthcare Professions Act २०२१ या अधिनियमाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने Maharashtra State Allied and Health Care Council Rules २०२४ दि.१०.१०.२०२४ रोजीच्या अधिसूचनेनुसार अधिसूचित केले आहे.

७. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, यांचे संदर्भिय पत्र क्र.०८ अन्वये दि.०६.०८.२०२६ रोजी झालेल्या बैठकीतील सूचनेनुसार मंडळाच्या परावैद्यक (पॅरामेडिकल/ हेल्थकेअर) गटातील अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रवेश पात्रता व परीक्षा पध्दतीत खालील प्रमाणे सुधारणा सुधारणा करण्यात येत आहे:

   ७.१. "प्रपत्र अ" मध्ये नमुद अभ्यासक्रमांच्या नावापुढे दर्शविल्याप्रमाणे प्रवेश पात्रतेत सुधारणा करण्यात येत आहे.

   ७.२. सर्व परावैद्य (पॅरामेडिकल) गटातील अभ्यासक्रमांत प्रवेश निश्चित करतांना प्रवेशीत उमेदवार व त्यांच्या पालकांकडुन प्रपत्र ब मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यात रु.१०० च्या भारतीय गैर न्यायिक स्टॅम्प पेपरवर संयुक्तपणे हमी पत्र घेण्यात यावे व सदर हमी पत्र ऑनलाईन प्रवेश अर्जात सादर (Upload) करण्यात यावे.

   ७.३. प्रपत्र अ मध्ये नमुद २ वर्षे कालावधीच्या पदवीका अभ्यासक्रमांच्या परीक्षा वार्षिक पध्दतीने घेण्यात येतील. तसेच अंतीम प्रमाणपत्र हे दोन्ही वार्षिक परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे निर्गमित करण्यात येईल.

८. मंडळाचे परावैद्यक (पॅरामेडीकल) गटातील पदवीका (Diploma) अभ्यासक्रम अद्ययावत करण्यात येत असुन अद्यावत अभ्यासक्रम यथावकाश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

९. अभ्यासक्रमांची सुधारित प्रवेश पात्रता व परीक्षा पध्दती तसेच, सुधारित अभ्यासक्रम प्रवेश सत्र २०२६-२७ व त्यापुढील प्रवेश सत्रात प्रवेश घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांकरिता लागू करण्यात येत आहे. प्रवेश सत्र २०२६-२७ प्रवेशीत उमेदवारांची परीक्षा नविन अभ्यासक्रमांप्रमाणे घेण्यात येईल.

१०. मंडळाचे परावैद्यक (पॅरामेडीकल) गटातील अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांचे मंडळ व महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई यांच्या संयुक्त समितीव्दारे नियमितपणे प्रत्यक्ष निरिक्षण करण्यात येईल.

११. परावैद्यक परिषदेच्या निर्देशानुसार, परावैद्यक परिषदेकडून नोंदणी मिळणेकरीता सदर बदल आवश्यक आहे.

(योगेश सुरेश पाटील)
संचालक

प्रत: माहितीसाठी

१. मा. अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मुंबई ३२
२. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई ३२
३. मा. प्रबंधक, महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिल, २३, लक्ष्मी ऑफसेट आणि प्रिंटिंग वर्क्स, ऑफिस नं.०८, गोवा स्ट्रीट, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई - ४०००३८
४. मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

१. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ छ.संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर
२. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (सर्व)
३. मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या मान्यता प्राप्त व इच्छुक संस्था
४. संगणक विभाग (मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकरिता)

प्रपत्र ब

प्रवेश निश्चित करतांना प्रवेशीत उमेदवार व त्यांच्या पालकांकडुन खालील अटींचा समावेश असलेले हमी पत्र रु.१०० च्या भारतीय गैर न्यायिक स्टॅम्प पेपरवर घेण्यात यावे व सदर हमी पत्र ऑनलाईन प्रवेश अर्जात सादर (Upload) करण्यात यावे.

हमीपत्र

मी _____ जन्म तारिख _____ प्रोफाईल क्र._____ प्रवेश सत्र _____ मध्ये _____ संस्थेत _____ अभ्यासक्रमात प्रवेश घेतला आहे.

मी प्रवेश घेतलेला अभ्यासक्रम Allied Health Care गटातिल असुन मी खालील प्रमाणे हमीपत्र लिहुन देत आहे:

१. Allied Health Care पदविका (Diploma) / प्रमाणपत्र (Certificate) स्तरावरील अभ्यासक्रमांत प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मी केवळ आरोग्य सहाय्यक म्हणुन काम करण्यास पात्र असेल.
२. Allied Health Care पदविका (Diploma) / प्रमाणपत्र (Certificate) स्तरावरील अभ्यासक्रम हे वैद्यकिय अभ्यासक्रम नाहीत व प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मी कोणत्याही रुग्णास कोणतेही औषधे लिहून देण्यास (prescribe drugs) पात्र नाहीत.
३. Allied Health Care पदविका (Diploma) / प्रमाणपत्र (Certificate) स्तरावरील अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर मी “डॉक्टर (Doctor)” ही उपाधी (Title) लावण्यास पात्र नाही.

दिनांक:
ठिकाण:

उमेदवाराची सही:
उमेदवाराचे नाव:

पालकाची सही:
पालकाचे नाव:
पालकाचे उमेदवाराशी नाते:

संस्थाचालक/ प्राचार्यांची सही:
संस्थाचालक/ प्राचार्यांचे नाव:
संस्थेचे नाव:
संस्था कोड:

प्रपत्र अ: प्रवेश सत्र २०२६-२७ पासुन सुधारित प्रवेश पात्रता

प्रपत्र अ


PART E

S.N.	Existing Course Name	Revised Course Name	Job Role	Course Duration	Entry Qualification From Admission Session 2026
1.	Diploma Course in Medical Laboratory Technology	Diploma Course in Medical Laboratory Technology	Laboratory Technician	2 Years	12TH STANDARD PASS
2.	Diploma Course in X-Ray Technology	Diploma Course in X-Ray Technology	X-Ray Technician	2 Years	12TH STANDARD PASS
3.	Diploma Course in RADIOLOGY AND IMAGING TECHNOLOGY	Diploma Course in Radiography and Ultra-Sonography Technology	Radiography and Ultra-Sonography Technician	2 Years	12TH STANDARD PASS
4.	Diploma Course in Radiotherapy Technology	Diploma Course in Radiotherapy Technology	Radiotherapy Technician	2 Years	12TH STANDARD PASS
5.	Diploma Course in Cardiology Technology	Diploma Course in Cardiology Technology	Cardiology Technician	2 Years	12TH STANDARD PASS
6.	Diploma Course in Neurology Technology	Diploma Course in Neurology Technology	Neurology Technician	2 Years	12TH STANDARD PASS
7.	Diploma Course in Blood Bank Technology	Diploma Course in Blood Bank Technology	Blood Bank Technician	2 Years	12TH STANDARD PASS
8.	Diploma Course in Blood Transfusion Management Technology	Diploma Course in Blood Transfusion Management Technology	Blood Transfusion Management Technician	2 Years	12TH STANDARD PASS
9.	Diploma Course in Optometry Technology	Diploma Course in Optometry Technology	Optometry Technician	2 Years	12TH STANDARD PASS
10.	Diploma Course in Perfusion Technology	Diploma Course in Perfusion Technology	Perfusion Technician	2 Years	12TH STANDARD PASS
11.	Diploma Course in OPERATION THEATER TECHNICIAN	Diploma Course in Operation Technology	Operation Technician	2 Years	12TH STANDARD PASS
12.	Diploma Course in Endoscopy Technology	Diploma Course in Endoscopy Technology	Endoscopy Technician	2 Years	12TH STANDARD PASS
13.	Diploma Course in Community Medicine Technology	Diploma Course in Community Medicine Technology	Community Medicine Technician	2 Years	12TH STANDARD PASS
14.	Diploma Course in Emergency Medicine Technology	Diploma Course in Emergency Medicine Technology	Emergency Medicine Technician	2 Years	12TH STANDARD PASS

S.N.	Existing Course Name	Revised Course Name	Job Role	Course Duration	Entry Qualification From Admission Session 2026
15.	Diploma Course in Forensic Science Technology	Diploma Course in Forensic Science Technology	Forensic Science Technician	2 Years	12TH STANDARD PASS
16.	Diploma Course in Medical Image Technology	Diploma Course in Medical Image Technology	Medical Image Technician	2 Years	12TH STANDARD PASS
17.	Diploma Course in Hemodialysis Technology	Diploma Course in Hemodialysis Technology	Hemodialysis Technician	2 Years	12TH STANDARD PASS
18.	Diploma Course in Dialysis Technology	Diploma Course in Dialysis Technology	Dialysis Technician	2 Years	12TH STANDARD PASS
19.	Diploma Course in Bio-Medical Technology	Diploma Course in Bio-Medical Technology	Bio-Medical Technician	2 Years	12TH STANDARD PASS

PART F

S.N.	Existing Course Name	Revised Course Name	Job Role	Course Duration	ENTRY QUALIFICATION FROM ADMISSION SESSION 2026
1.	C.C in Ophthalmic Technology	C.C in Ophthalmic Technology	Ophthalmic Technician	1 Year	12TH STANDARD PASS
2.	C.C in Radiology Technology	C.C in Radiology Technology	Radiology Technician	1 Year	12TH STANDARD PASS
3.	C.C in Dialysis Technology	C.C in Dialysis Technology	Dialysis Technician	1 Year	12TH STANDARD PASS
4.	C.C in PATHOLOGY TECHNICIAN	C.C in Laboratory Technology	Laboratory Technician	1 Year	12TH STANDARD PASS
5.	C.C in X-ray Technology	C.C in X-ray Technology	X-ray Technician	1 Year	12TH STANDARD PASS



(योगेश सुरेश पाटील)
संचालक